CR1966110922

तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याखाली
जमिनीच्या झालेल्या खरेदी विक्रीच्या
व्यवहाराबाबत -

महाराष्ट्र शासन.
महसूल व वन विभाग.
परिपत्रक क्रमांक सी ओ एन-१०६६-१८२८१५-ब,
सचिवालय, मुंबई,३२, दिनांक ९ नोव्हेंबर १९६६.

## परिपत्रक.

जमिनीच्या खरेदी विक्रीकरता संबंधित अधिकाऱ्याची पूर्व परवानगी न घेता जमिनीचे केलेले हस्तांतरण वगैरे व्यवहार हे तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याच्या कलम ९ प्रमाणे अवैध होत असतात. दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ पूर्वी झालेले खरेदी विक्रीचे असे अवैध व्यवहार १९६५ च्या तुकडे बंदी व तुकडे जोड (दुरुस्ती) कायद्याने केलेल्या तरतुदीप्रमाणे (कलम ३१ अअ) वैध करण्याची आता तरतूद केलेली आहे या बाबतीत घ्यावयाच्या कार्यवाहीबद्दल एक प्रश्न शासनाचे आदेशाकरिता उपस्थित करण्यांत आलेला आहे. ह्या प्रकरणांत अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबद्दल असे सूचविले आहे कीं प्रथमतः तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याच्या कलम ९ प्रमाणे अवैध प्रकरणांमध्ये योग्य ती कार्यवाही करुन खरेदी विक्रीचे व्यवहार गैर कायदेशीर ठरवावे लागतील. त्या नंतर दुरुस्त कायद्याच्या कलम ३१ अ अ प्रमाणे सदर व्यवहार वैध ठरविण्यासाठी वेगळे प्रकरण सुरु करावे लागेल. या बाबतींत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे कळविण्यांत येते कीं जमिनीच्या खरेदी विक्री झालेल्या प्रकरणांत वरील प्रमाणे कलम ९ व नवे कलम ३१ अ अ प्रमाणे वेगवेगळी कार्यवाही करण्याची जरुरी नाहीं. एखादा खरेदी अगर विक्रीचा व्यवहार तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याचे तरतुदीप्रमाणे अवैध ठरणारा प्रथम दर्शनी वाटला तर संबंधित व्यक्तींना नोटीस काढून व योग्य चौकशी करुन त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आपला निर्णय नोंदवावा परंतु कलम ९ प्रमाणे दंड किंवा बेदखली (eviction) या हुकूम न काढता कलम ३१ अ अ प्रमाणे जर तो व्यवहार वैध ठरविण्यासारखा असल्यास त्याबाबत भरावयाच्या रकमेचा (penalty) भरणा करण्यासंबंधी संबंधित खरेदीदाराला समज द्यावी. दंडाच्या रकमेचा भरणा झाल्यावर कलम ३१ अ अ चे तरतुदीप्रमाणे सदर व्यवहार वैध ठरविल्याबाबत योग्य तो हुकूम काढला जावा.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावानें,

(ज. गो. करंदीकर),
अवर सचिव, महसूल व वन विभाग.



मागे पहा.....

प्रत :-

सर्व आयुक्त,

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे,

* जिल्हाधिकारी, नाशिक, (त्यांचे पत्र क्रमांक टेनन्सी-७०४२-६६, दिनांक ५ ऑक्टोबर १९६६ चे संदर्भात), * सोबत कागदपत्र.

इतर सर्व जिल्हाधिकारी.

क्रमांक कॉन·एल·आर ५७ १९६६. दि.२२-११-६६

प्रत माहिती व मार्गदर्शनासाठी पुढील प्रमाणे पाठविण्यात येत आहे :

एकत्रीकरण अधिकारी (सर्व) यांचेकडे सहा. ए. अधी. यांनी कार्यालयाकडे पाठवण्याचे प्रतीसह

ज.रा.७५
१५०११६६

जमाबंदी - आयुक्त आणि संचा. भूमि. अभि. म.रा. पुणे यांचेकरिता
पे. ७-११

~~REGISTERED PARCEL~~

DESPATCHED on 22-11-66

तुकडेबंदी व तुकडे जोड कायद्याखाली जमिनीच्या झालेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराबाबत..

249

महाराष्ट्र शासन.
महसूल व वन विभाग.
परिपत्रक क्रमांक सी.ओ.एन्. १०६६-१८२८१५-व,
सचिवालय; मुंबई ३२, दिनांक ९ नोव्हेंबर १९६६.

## परिपत्रक

जमिनीच्या खरेदी विक्रीकरता संबंधित अधिका-यांची पूर्व परवानगी न घेता जमिनीचे केलेले हस्तांतरण वगैरे व्यवहार हे तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याच्या कलम ९ प्रमाणें अवैध होत असतात. दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ पूर्वी झालेले खरेदी विक्रीचे असे अवैध व्यवहार १९६५ च्या तुकडेबंदी व तुकडे जोड(दुरुस्ती) कायद्याने केलेल्या तरतुदीप्रमाणें ( कलम ३१ अअ ) वैध करण्याची आतां तरतूद केलेली आहे. या बाबतींत घ्यावयाच्या कार्यवाही बद्दल एक प्रश्न शासनाचे आदेशाकरितां उपस्थित करण्यांत आलेला आहे. ह्या प्रकरणांत अवलंबावयाच्या कार्यपद्धती बद्दल असे सुचविले आहे कीं, प्रथमतः तुकडेबंदी व तुकडे जोड कायद्याच्या कलम ९ प्रमाणें अवैध प्रकरणांमध्ये योग्य ती कार्यवाही करुन खरेदी विक्रीचे व्यवहार गैर कायदेशीर ठरवावे लागतील. त्यानंतर दुरुस्त कायद्याच्या कलम ३१ अ अ प्रमाणें सदर व्यवहार वैध ठरविण्यासाठीं वेगळे प्रकरण सुरुं करावे लागेल. या बाबतींत सर्व जिल्हाधिका-यांना असे कळविण्यांत येते कीं, जमिनीच्या खरेदी विक्री झालेल्या प्रकरणांत वरील प्रमाणें कलम ९ व नवे कलम ३१ अ अ प्रमाणें वेगवेगळी कार्यवाही करण्याची जरुरी नाहीं. एखादा खरेदी अगर विक्रीचा [illegible]--बाबतचा व्यवहार तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याचे तरतुदीप्रमाणें अवैध ठरणारा प्रथम दर्शनी वाटला तर संबंधित व्यक्तींना नोटीस काढून व योग्य चौकशी करुन त्याबाबत जिल्हाधिका-यांनी आपला निर्णय नोंदवावा परंतु कलम ९ प्रमाणें दंड किंवा बेदखली ( eviction ) चा हुकूम न काढतां कलम ३१ अ अ प्रमाणें जर तो व्यवहार वैध ठरविण्यासारखा असल्यास त्याबाबत भरावयाच्या रकमेचा ( ( penalty ) भरणा करण्यासंबंधी संबंधित खरेदीदाराला समज द्यावी. दंडाच्या रकमेचा भरणा झाल्यावर कलम ३१ अ अ चे तरतुदी प्रमाणें सदर व्यवहार वैध ठरविल्याबाबत योग्य तो हुकूम काढला जावा.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

सही- ज.गो.करंदीकर
अवर सचिव, महसूल व वन विभाग

कृ.मा.प.----

क्रमांक: कॉन-एल्.आर.-५४

पुणें; दि: २२ -११-१९६६.

प्रत माहितीं व मार्गदर्शन यासाठीं पुढील प्रमाणें पाठविण्यांत येत आहे :
एकत्रीकरण अधिकारी ( सर्व ) यांचेकडे सहायक एकत्रीकरण अधिकारी, यांचे कार्यालयाकडे पाठविणेचे प्रतीसह.

रा. रा. अभ्यंकर.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, म.राज्य, पुणें यांचेकरितां.

पृ. २२-११ वाल्मुर्णे.

तुकडेबंदी व तुकडे जोड कायद्याखाली जमिनीच्या
झालेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्रमांक सी. ओ. एन. १०६६-८२८१५-ब,
सचिवालय, मुंबई ३२, दिनांक ९ नोव्हेंबर १९६६.

परिपत्रक
========

जमिनीच्या खरेदी विक्रीकरता संबंधित अधिकाऱ्याची पूर्व परवानगी न घेता जमिनीचे केलेले हस्तांतरण वगैरे व्यवहार हे तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याच्या कलम ९ प्रमाणे अवैध होत असतात. दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ पूर्वी झालेले खरेदी विक्रीचे असे अवैध व्यवहार १९६५ च्या तुकडेबंदी व तुकडे जोड (दुरुस्ती) कायद्याने केलेल्या तरतुदीप्रमाणे (कलम ३१अअ) वैध करण्याची आता तरतूद केलेली आहे. या बाबतीत घ्यावयाच्या कार्यवाहीबद्दल एक प्रश्न शासनाचे आदेशाकरिता उपस्थित करण्यात आलेला आहे. ह्या प्रकरणात अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबद्दल असे सुचविले आहे की, प्रथमतः तुकडेबंदी व तुकडेजोड कायद्याच्या कलम ९ प्रमाणे अवैध प्रकरणांमध्ये योग्य ती कार्यवाही करून खरेदी विक्रीचे व्यवहार गैर कायदेशीर ठरवावे लागतील. त्यानंतर दुरुस्त कायद्याच्या कलम ३१ अअ प्रमाणे सदर व्यवहार वैध ठरविण्यासाठी वेगळे प्रकरण सुरु करावे लागेल. याबाबतीत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे कळविण्यात येते की जमिनीच्या खरेदी विक्री झालेल्या प्रकरणात वरील प्रमाणे कलम ९ व नवे कलम ३१अअ प्रमाणे वेगवेगळी कार्यवाही करण्याची जरुरी नाही. एखादा खरेदी अगर विक्रीचा व्यवहार तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याचे तरतुदीप्रमाणे अवैध ठरणारा प्रथम दर्शनी वाटला तर संबंधित व्यक्तींना नोटीस काढून व योग्य चौकशी करून त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आपला निर्णय नोंदवावा परंतु कलम ९ प्रमाणे दंड किंवा बेदखली ( Eviction ) चा हुकूम न काढता कलम ३१अअ प्रमाणे जर तो व्यवहार वैध ठरविण्यासारखा असल्यास त्याबाबत भरावयाच्या रकमेचा ( Penulty ) भरणा करण्यासंबंधी संबंधित खरेदीदाराला समज द्यावी. दंडाच्या रकमेचा भरणा झाल्यावर कलम ३१अअ चे तरतुदीप्रमाणे सदर व्यवहार वैध ठरविल्याबाबत योग्य तो हुकूम काढला जावा.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

सही - ज. गो. करंदीकर
अवर सचिव, महसूल व वन विभाग.



ति-२५७६८